RNI No. MAHBIL/2009/31743

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-ब

वर्ष ७, अंक २२] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ३०-ऑक्टोबर ६, २०२१/ आश्विन ८-१४, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग (विशेष)

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ सप्टेंबर २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादाय व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हीडीओपायरेट्स) वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१.**

क्रमांक एमआयएस-०२२०/प्र.क्र.४५/विशा-३अ.—महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादाय व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हीडीओपायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५५) याच्या कलम ९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सल्लागार मंडळ गठीत करण्याच्या संबंधातील यापूर्वीचे आदेश व अधिसूचना अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता सल्लागार मंडळ तात्काळ पुनर्गठीत करीत आहे आणि त्याचा अध्यक्ष म्हणून मा. न्यायमूर्ती श्री. अ.अ.सय्यद, यांची आणि उक्त सल्लागार मंडळाचे सदस्य म्हणून मा. न्यायमूर्ती श्री. आर.एम. सावंत (सेवानिवृत्त) व मा. न्यायमूर्ती श्री. पी.व्ही. हरदास (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**तुषार महाजन,**
शासनाचे अवर सचिव.

## HOME DEPARTMENT (SPECIAL)

2nd Floor, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th September, 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS, BOOTLEGGERS, DRUG-OFFENDERS, DANGEROUS PERSONS, VIDEO PIRATES, SAND SMUGGLERS AND PERSONS ENGAGED IN BLACK- MARKETING OF ESSENTIAL COMMODITIES ACT, 1981.

No.MIS-0220/CR-45/SPL-3(A).—In exercise of the powers conferred by section 9 of the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders, Dangerous Persons, Video Pirates, Sand Smugglers and Persons engaged in Black-Marketing of Essential Commodities Act, 1981 (Mah. LV of 1981) and supersession of earlier orders and notifications regarding constitutions of the Advisory Board, the Government of Maharashtra hereby re-constitutes, with immediate effect, the Advisory Board for the purpose of the said Act and appoints Hon'ble Shri Justice A. A. Sayed, to be its Chairman and Hon'ble Shri Justice R. M. Savant (Retd.) and the Hon'ble Shri Justice P. V. Hardas (Retd.) as Members of the Advisory Board.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

TUSHAR MAHAJAN,
Under Secretary to the Government.

## पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ सप्टेंबर २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५.**

क्रमांक वृक्षअ २०२१/प्र.क्र.४०/ तां.क. ४.— महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४) याच्या कलम ८ च्या पोट-कलम (३) च्या खंड (अ) च्या उप खंड (सहा) आणि पोट-कलम (५) च्या खंड (ब) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वृक्षांचे वय निर्धारित करण्यासाठी पुढील निकष व पद्धत अधिसूचित करीत आहे :—

वृक्षाचे वय पुढील पद्धतींचा वापर करून निर्धारित करता येईल :—

**पद्धत १.**— (एक) वृक्षाचे लेखी अभिलेख उपलब्ध असल्यास, वृक्षाचे वय, वृक्ष लागवडीचे वर्ष किंवा वृक्षाचे वय नमूद करणाऱ्या उपलब्ध अभिलेखांच्या आधारे निर्धारित करता येईल; किंवा

(दोन) लेखी अभिलेख उपलब्ध नसल्यास, वृक्षाचे वय साक्षीदारांची अभिसाक्ष नोंदवून निर्धारित करता येईल.

**पद्धत २.**— प्रजातींच्या विशिष्ट वाढीच्या घटकाद्वारे वृक्षाच्या व्यासास गुणणे. उदा. काही प्रजातींच्या वाढीचे घटक या सोबत जोडलेल्या **जोडपत्र- १** मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आहेत.

**पद्धत ३.**— इन्क्रिमेंट बोअरर या उपकरणाच्या वापराचा अंतर्भाव असलेल्या पद्धतीवर आधारित. ही पद्धत नवीन असल्याने, स्थानिक वृक्ष प्राधिकरणाद्वारे कौशल्य विकसित होईपर्यंत, स्थानिक वन अधिकाऱ्यांच्या तज्ञ मार्गदर्शनाखाली कार्यान्वित करावी.

### जोडपत्र-एक

वाढीचा घटकाचा वापर करून वृक्षाचे वय निर्धारित करण्याचे टप्पे:

(१) जमिनीपासून सुमारे साडेचार फूट उंचीवर मोजपट्टीचा (टेप) वापर करून वृक्षाचा परीघ (इंचात) मोजणे.

(२) वृक्षाचा व्यास (इंच मध्ये) काढण्यासाठी परिघाचा वापर करणे.(व्यास काढण्याचे सूत्र आहेः व्यास = परीघ भागीले ३.१४)

(३) वाढीच्या घटकाने व्यासाला गुणून वृक्षाचे अंदाजित वय काढणे.

उदा. २० इंचाचा परिघ आणि वाढीचा घटक ३.० असलेल्या वृक्षाकरीता.

- व्यास = २० / ३.१४ = ६.३६९.
- वृक्षाचे वय = व्यास* वाढीचा घटक = ६.३६९ * ३ = १९.१०८
- वृक्षाचे वय १९ वर्षे आहे.

महाराष्ट्रातील काही सर्वसाधारण वृक्षांच्या प्रजातीच्या वाढचे घटक :

| प्रजाती | वाढचे घटक |
|---|---|
| साल | ७.४७ |
| सागवान | ३.०३ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु.कि. निकम,**
शासनाचे सहसचिव.

## ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd September 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.

No.vrukshaa 2021/CR40/TC-4.— In exercise of the powers conferred by sub-clause *(vi)* of clause *(a)* of sub-section *(3)* and clause *(b)* of sub-section *(5)* of section 8 of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975 (Mah. XLIV of 1975), the Government of Maharashtra hereby notifies the following criteria and method to determine age of the tree as given below, for the purposes of the said Act, namely :—

Age of the tree can be determined by using following methods, namely :—

*Method-1.*— *(i)* In case of the written records of the tree are available, age of the tree may be determined on the basis of available records indicating year of plantation of the tree or age of the tree; or

*(ii)* In case of the written records are not available, age of the tree may be determined with the help of recorded witness testimony.

*Method-2.*— Multiplying diameter of the tree by species specific growth factor e.g. growth factor of some species is as defined in the *Annexure-I* appended herewith.

*Method-3.*— Based on method involving use of increment borer instrument. This method, being a new method, need to be executed under expert guidance of local forest officials till the time expertise is developed by the local tree authority.

*Annexure-I*

Steps to determine age of the tree using growth factor :—

1. Measure circumference (in inches) of the tree using measuring tape at about four and a half feet above the ground.

2. Use the circumference to find the diameter (in inches) of the tree.

(The formula for finding diameter is: Diameter = circumference divided by 3.14).

3. Estimate the age of the tree by multiplying the diameter by the growth factor.

e.g. for a tree with circumference of 20 inches and growth factor of 3.0

- Diameter = 20 / 3.14 = 6.369.
- Age of the tree = diameter * growth factor = 6.369 * 3 = 19.108
- The tree is 19 years old.

Growth Factors for few common tree species in Maharashtra :—

| **Species** | **Growth Factor** |
|---|---|
| Sal | 7.47 |
| Teak | 3.03 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. NIKAM,
Joint Secretary to Government.

## पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ सप्टेंबर २०२१.

## अधिसूचना

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५.**

क्रमांक वृक्षअ २०२१/प्र.क्र.४२/तां.क.४.— महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४) याच्या कलम २ च्या पोट-कलम (१क) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, वृक्ष प्राधिकरणाद्वारे पुरातन (हेरिटेज) वृक्ष म्हणून एखाद्या वृक्षास वर्गीकृत करण्यासाठी पुढील मानके अधिसूचित करीत आहे :—

कोणत्याही प्रजातीचे आणि अंदाजे वय ५० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे वृक्ष (झाड).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. निकम,**
शासनाचे सहसचिव.

## ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd September 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.

No. vrukshaa 2021/CR 42/TC-4.— In exercise of the powers conferred by clause *(1a)* of section 2 of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975 (Mah. XLIV of 1975), the Government of Maharashtra hereby notifies the following norms to categorise a tree as the heritage tree by the Tree Authority, namely :—

A tree shall be of any species and of estimated age of 50 years or more.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. NIKAM,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.